महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id : mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/२९२३
दिनांक : ३१ /०७/२०२०

## आदेश

विषय :- कोरोना विषाणु प्रतिबंध व नियंत्रणा साठी -पुणे महापालिका क्षेत्रासाठी सुधारित आदेश – लॉकडाऊन टप्याटप्याने उठविणे आणि या कालावधीत प्रतिबंधने कमी करणे बाबत आदेश (**मिशन बिगीन अगेन**)

संदर्भ :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

३) महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम,२०२०

४) महसूल व वन विभाग आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्र. डीएमयु/२०२०/प्र.क्र./९२/डी आयएसएम-१ दि.२९ जुलै २०२०.

ज्याअर्थी जागतीक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रसार पुणे महानगरपालिका हद्दीत गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे. तसेच राज्य शासनाने कोव्हिड - १९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४ च्या तरतुदी दिनांक १३/०३/२०२० च्या अधिसुचनेपासून लागू करण्यात आलेली असून त्या अंतर्गत नियमावली महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम - २०२० तयार करुन दिनांक १४/३/२०२० ला प्रसिध्द करण्यात आली या नियमावलीतील नियम १० नुसार कोव्हिड -१९ चा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहेत.

ज्याअर्थी, महसुल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र. डीएमयु/२०२०/प्र.क्र./९२/डी आयएसएम-१, दिनांक

२९ जुलै २०२० नुसार निर्देश देण्यात आले आहेत की, स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन महानगरपालिका आयुक्तांस साथरोगाच्या फैलावास प्रतिबंध करण्यासाठी स्थानिक क्षेत्रामध्ये काही उपाययोजनांची अमंलबजावणी करता येईल आणि परवानगी दिलली बिगर अत्यावश्यक कार्ये व नागरिकांच्या संचार करण्यावर आवश्यक ते निर्बंध घालता येतील.

त्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीचे कार्यक्षेत्रातील कोरोना विषाणूचा प्रतिबंध करुन वाढती रुग्णसंख्या आटोक्यात आणण्यासाठी काही उपाययोजना करणे गरजेचे आहे म्हणून विषाणूचा फैलाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी वा परिरोध करण्यासाठी तातडीची उपाययोजना म्हणून साथरोग अधिनियम, १८९७ चे कलम २,३ व ४ तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम, २०२० याच्या अन्य सर्व सहाय्यकारी तरतुदी अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन पूणे महानगरपालिका हद्दीत मी, विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे आपल्या अधिकारात या आदेशाद्वारे पुणे शहराचे हद्दीत कोव्हिड - १९ विषाणूचा प्रतिबंध करण्यासाठी दिनांक ०१.०८.२०२० चे पहाटे ०१:०० वाजे पासून ते दिनांक ३१.०८.२०२० रोजीचे रात्री १२:०० वाजेपर्यंत संपूर्ण लॉकडाऊन जाहीर करीत आहे.

**अ) नागरिकांच्या सुरक्षितते संबंधीचे उपाय :**

१) केंद्र शासनाच्या कोविड-१९ च्या नियंत्रणाच्या अनुषंगाने निर्गत केलेले निर्देश(जोडपत्र-१) लागू राहतील.

२) नागरिकांनी सामानाची खरेदी,मोकळ्या जागेतील शारीरिक व्यायाम आपण राहत असलेल्या क्षेत्राच्या ठिकाणीच करावा.

*३) ६५ वयोगटा पेक्षा अधिक वय असलेल्या, आजारी व्यक्ती, गरोदर महिला, १०वर्षापेक्षा कमी वय असलेली मुले यांना अत्यावश्यक सेवा आणि आरोग्य विषयक अडचणी शिवाय घराबाहेर जाता येणार नाही.*

**ब) प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone)**

१) या पूर्वी प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) जाहीर केलेल्या क्षेत्रामध्ये अत्यावश्यक सेवा/वस्तू विक्री / सेवा करण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपद्धती असेल.

प्रतिबंधित क्षेत्रात अत्यावश्यक वस्तूंची दुकाने (किराणा दुकान, फळे/भाजीपाला विक्री,दुध विक्री, रेशन दुकाने, इ.) सकाळी ०८.०० ते दुपारी १२.०० आणि दुपारी ०५.०० ते सायंकाळी ०६.००

वाजेपर्यंत उघडी राहतील.तर औषध विक्री, दवाखाने हे त्यांच्या वेळे प्रमाणे खुली राहतील.

## क) प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील(Outside Containment Zone):

सदरील आदेश लागू झाल्यापासून पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील(Outside Containment Zone) ठिकाणी खालील आस्थापना सुरु राहतील.

१) सर्व अत्यावश्यक वस्तूंची दुकाने/सेवा जसे औषधी विक्री दुकाने,दवाखाने त्यांच्या वेळेत दररोज सुरु राहतील तर अन्य अत्यावश्यक वस्तूंची दुकाने/सेवा **सकाळी ९ ते सायंकाळी ७** यावेळेत खुली राहतील.

२) सर्व बिगर अत्यावश्यक वस्तूंची दुकाने या पूर्वीच्या आदेशात नमूद केल्या प्रमाणे P-1,P-2 पद्धती प्रमाणे **सकाळी ९ ते सायंकाळी ७** यावेळेत खुली राहतील. मद्यविक्रीची दुकानास यापूर्वी संबंधितांना परवानगी मिळाली असल्यास ते घरपोच सेवा किंवा नेहमीच्या पद्धतीप्रमाणे सुरू राहू शकतील.

३) पुणे शहरातील मनपाच्या मंडई मधील सम क्रमांकाचे गाळे सम दिनांकास तर विषम क्रमांकाचे गाळे विषम दिनांकास उघडी राहतील.

४) मॉल आणि मार्केट कॉम्प्लेक्स दि. ०५/०८/२०२० पासून **सकाळी ९ ते सायंकाळी ७** यावेळेत उघडी राहतील. मात्र, यामधील सिनेमागृहे, उपहारगृहे येथे नागरिकांना त्याच ठिकाणावरून यामधील खाद्यपदार्थांचा लाभ देता येणार नाही. तथापि, या ठिकाणाहून खाद्यपदार्थांची घरपोच सेवा करण्यास परवानगी राहील.

५) **ई-कॉमर्स:** ई-कॉमर्सच्या माध्यमातून अत्यावश्यक / बिगर अत्यावश्यक वस्तूचे घरपोच वितरण करता येईल. तसेच कुरिअर सेवा सुरु राहतील.

६) यापूर्वी परवानगी दिलेल्या सर्व औद्योगिक आस्थापना तसेच, शेतमालाशी / कृषीनिगडीत प्रक्रिया उद्योग उक्त कालावधीत सुरू राहतील. सर्व प्रकारचे दवाखाने, इस्पितळे, औषध विक्रीची दुकाने ; अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन करणारे व्यवसाय यात औषधी, वैद्यकीय उपकरणे व त्यांना लागणारा कच्चा माल, इ. ; तसेच ज्याठिकाणी वस्तूचे उत्पादन करणेसाठी कामामध्ये सातत्य ठेवावे लागते अश्या बाबी ; माहिती व तंत्रज्ञान विषयक हार्डवेअरची निर्मिती तसेच पॅकेजिंग करिता लागणाऱ्या वस्तूंची निर्मिती, अन्न प्रक्रिया उद्योग जसे ब्रेड उत्पादक कारखाना, दुध प्रक्रिया केंद्र,

पिठाची गिरणी, दालमिल या ठिकाणी कामगारांच्या कामाच्या वेळा निश्चित करून व त्यांच्या सुरक्षित अंतर ठेवून करता येऊ शकते.

७) सर्व बांधकामांची ठिकाणे (खाजगी व सार्वजनिक) ज्यांना परवानगी देण्यात आली होती आणि सुरू होती, तसेच पावसाळापूर्व कामे (खाजगी व सार्वजनिक) ज्यांना परवानगी दिली होती, ती सुरू राहतील.

८) **खाद्य पदार्थांची सेवा :** खाद्य पदार्थांची पार्सल सेवा देणारे व्यवसाय सुरु ठेवता येतील.

९) ऑनलाईन / दुरस्थ शिक्षण आणि अनुषंगिक बाबी सुरू राहतील.

१०) शासकीय कार्यालये : सर्व शासकीय कार्यालयांमध्ये (आरोग्य व वैद्यकीय सेवा,अत्यावश्यक सेवा,कोषागार,आपत्ती व्यवस्थापन,पोलीस,राष्ट्रीय माहिती केंद्र, अन्न व नागरी पुरवठा, फुड कार्पोरेशन ऑफ इंडिया, नेहरू युवा केंद्र, महापालिका सेवा त्यांना आवश्यक असेल त्या कर्मचारी संख्या वर काम करतील) १५ % किवा किमान १५ कर्मचारी या पैकी जी संख्या जास्त असेल ती वापरून कार्यालये सुरु ठेवता येईल.

११) खाजगी कार्यालये : सर्व खाजगी कार्यालये त्यांच्या कर्मचारी संख्येच्या जास्तीत जास्त १०% किंवा १० व्यक्ती या पैकी जे जास्ती असेल त्या पर्यंत कर्मचारी वापरून कार्यालये सुरु ठेवू शकतील, उर्वरित कर्मचारी यांना घरी थांबवून काम करतील. सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यालयातील काम संपल्यानंतर घरी जाताना विशेष काळजी घ्यावी जेणेकरून कोरोनाचा संसर्ग लवकर होऊ शकणाऱ्या व्यक्ती, प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांना याचा संसर्ग होणार नाही याबाबत कर्मचा-यांचे उद्द्बोधन करावे.

१२) **माहिती तंत्रज्ञान :** माहिती तंत्रज्ञान विषयक काम करणारे व सेवा देणारे व्यवसाय, दूरसंचार क्षेत्रात(शासकीय व खाजगी) काम करणारे त्यांच्या एकूण कर्मचा-यांपैकी ५०% कर्मचा-यांवर सुरु ठेवता येतील तसेच डाटा व कॉल सेंटर कमीतकमी कर्मचा-यांचा वापर करून सुरु ठेवता येतील.

१३) छोटे स्वयं रोजगार करणारे व्यक्ती जसे प्लंबर,विद्युत विषयक काम करणारे, पेस्ट कंट्रोल,आणि अन्य तांत्रिक स्वरूपाचे व्यवसाय करणारे व्यक्ती सामाजिक सुरक्षित अंतर, मास्क आणि सॅनिटायझर यांचा वापर करून काम करू शकतात.

१४) नागरिक आपले वाहने, वाहन दुरुस्ती करणारे गॅरेज यांची पूर्व नियोजित वेळ निश्चित करून घेऊन जाऊ शकतात.

१५) विवाह सोहळयाच्या निगडीत बाबी केवळ मोकळया जागेत,हिरवळीवर,किंवा वातानुकुलीन यंत्रणा नसलेल्या हॉल मध्ये घेता येऊ शकतील.

१६) आऊट डोअर (घरा बाहेरील) व्यायामास सोबतच्या अटींच्या आधारे परवानगी राहील.(जोडपत्र-२)

१७) वर्तमानपत्राची छपाई आणि वितरण सुरू राहील.

१८) **शैक्षणिक संस्था** (विद्यापीठ, महाविद्यालये, शाळा) यांची कार्यालये/कर्मचारी, अशैक्षणिक कामाकरिता जसे विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी तयार करावयाचे ई-कंटेन्ट, उत्तरपत्रिका तपासणे व निकाल जाहीर करणे, तसेच संशोधन करणारे शास्त्रज्ञ आणि कर्मचारी यांच्याकरिता खुले राहील.

१९) केश कर्तनालय, ब्युटीपार्लर यापूर्वी निश्चित केलेल्या अटींवर सुरू राहतील.

२०) मोकळया मैदानात खेळावयाचे सांघिक खेळ वगळता अन्य खेळ जसे गोल्फ, नेमबाजी, टेनिस, जिम्नॅस्टीक, मल्लखांब आणि आऊट डोअर बॅडमिंटन कोरोनाच्या पार्श्वभुमीवर सुरक्षित अंतर आणि योग्य प्रकारचे सॅनिटाझेशन करून **दि.०५/०८/२०२०** पासून वापस सुरू करता येईल. तथापि, पोहण्याच्या तलावाचा वापर बंद राहील.

२१) **घरकाम करणाऱ्या व्यक्ती :** प्रतिबंधित क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील ठिकाणी घरकाम करण्यास मनाई करण्यात येत आहे. प्रतिबंधित क्षेत्राच्या बाहेर राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या घरी, घर मालकाची इच्छा असल्यास स्वच्छेने काम करता येईल.

२२) **ज्येष्ठ नागरिक :** ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या मदतीकरिता लागणाऱ्या व्यक्ती, रुग्णसेवेसाठी मदतनीस व्यक्ती, हेल्पर, घरकाम करणारी व्यक्ती, वाहनचालक, इ. यांची मदत घेता येईल.

२३) **वित्तीय क्षेत्र :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि त्यांनी नियंत्रित केलेल्या आर्थिक संस्था सुरु राहतील. तर ATM, बँका, सहकारी पतसंस्था, विमा कंपन्या यांची कार्यालये सुरु राहतील.

२४) **सुरक्षा व सेवा व्यवस्था :** रहिवासी संकुल व कार्यालयांना व्यवस्थित ठेवण्यासाठी लागणाऱ्या सेवा व सुरक्षा पुरविणाऱ्या खाजगी संस्था सुरु राहतील .

२५) **वाहनांचा वापर :** नागरिकांना कामासाठी खालील प्रकारच्या वाहनांचा वापर करता येईल. मात्र असा प्रवास करतांना मास्क परिधान करणे आवश्यक राहील.

| वाहनाचा प्रकार | किती व्यक्ती वापरू शकतील |
|---|---|
| टॅक्सी / कॅब | वाहनचालक + ३ |
| रिक्षा | वाहनचालक + २ |
| चारचाकी स्वयंचलित वाहन | वाहनचालक + ३ |
| दुचाकी स्वयंचलित वाहन | केवळ वाहन चालविणारी व्यक्ती +१ (हेल्मेट आणि मास्क सह) |

२५) **पथारी व्यावसायिक** : खालील नमूद रस्त्यांशिवाय अधिकृत पथारी व्यावसायिक यांना दररोज खालील अटीवर सकाळी ०९.०० ते संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत व्यवसाय करता येईल.

अ) २ पथारी व्यावसायिकांमध्ये अंतर १० मीटर ठेवावे व

ब) हातमोजे व मास्क घालून विक्री करता येईल.

- शिवाजी रोड - पुणे मनपा - डेंगळे पुल - शनिवार वाडा ते जेधे चौक
- बाजीराव रोड - पुरम चौक - माडीवाले कॉलनी – शनिवार चौक – विश्रामबागवाडा -शनिवारवाडा.
- हडपसर - सोलापूर रोड - मगरपट्टा चौक ते गाडीतळ, गाडीतळ ते लक्ष्मी कॉलनी चौक ते शेवाळवाडी टोलनाका ते पुणे शहर हद्द पर्यंत तसेच गाडीतळ ते फुरसंगी सासवड रोडने पुणे शहर हद्दपर्यंत.
- सातारा रोड – जेधे चौक - लक्ष्मीनारायण थिएटर, सिटी प्राईड, विवेकानंद पुतळा, धनकवडी फ्लाय ओव्हर ते कात्रज चौक, कात्रज चौक ते सातारा रोडने पुणे शहर हद्दपर्यत.
- नगर रोड - येरवडा पर्णकुटी, गुंजन चौक, विमाननगर, वडगावशेरी, खराडी बायपास चौक ते वाघोली, तैलाची मोरी पुणे शहर हद्दपर्यंत.
- एअरपोर्ट रोड - गुंजन चौक - गोल्फ क्लब रोड - येरवडा पोस्ट ऑफिस - नागपुर चाळ - जैलरोड पौलीस चौकी - संजय पार्क - ५०९ चौक – एअरपोर्ट.
- सिंहगड रोड - दांडेकर पुल - पानमळा - रोहन कृतिका लगत, नाकोडा नगर – राजाराम पूल– विठ्ठलवाडी फुटपाथ - संतोष हॉल – आनंदनगर, माणिकबाग – वडगाव धायरी उड्डाणपुल, धायरी फाटा -धायरी शेवटचा बसस्टॉप.
- पौड रोड- खंडोजी बाबा चौक - स्वातंत्र्य चौक - नळ स्टॉप- कर्वेरस्ता फ्लायओव्हर- आनंदनगर- शास्त्री नगरकोथरुड बस डेपो- चांदणी चौक.
- जंगली महाराज रोड- संचेती चौक- झाशी राणी चौक-डेक्कन जिमखाना-संभाजी पुतळा - खंडोजी बाबा चौक.
- एफ.सी. रोड - खंडोजी बाबा चौक – गुडलक चौक - वैशाली हॉटेल - फर्गुसन कॉलेज- संत ज्ञानेश्वर पादुका चौक- शिवाजीनगर पोलीस स्टेशन.

- गणेशखिंड रोड-शिमला चौक - म्हसोबा चौक - सेंट्रल मॉल – शासकीय तंत्रनिकेतन- विद्यापीठ चौक- राजभवन- इदिरा गांधी झोपडपट्टी- राजीव गांधी पूल औंध- पुणे शहर हद्दपर्यंत.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक ३१/०७/२०२० रोजी दिलेला आहे.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका, पुणे

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.
३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.
यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

# जोडपत्र - एक

## कोव्हिड - १९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निर्देश

१. मुखपट्टीचा वापर करणे :- सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी व प्रवास करताना, मुखपट्टीचा / फेस मार्कचा वापर करणे अनिवार्य आहे. मुखपट्टीचा वापर न केल्यास सदर व्यक्ती दंडनिय कार्यवाहीस पात्र राहील.

२. सामाजिक अंतर राखणे :- सार्वजनिक ठिकाणी, सर्व व्यक्तींनी कमीत कमी ६ फुट ( २ गज की दुरी) इतके अंतर राखले पाहिजे. दुकानदार, ग्राहकांमध्ये शारीरिक अंतर राखण्याची सुनिश्चिती करतील आणि एकावेळी पाचपेक्षा अधिक व्यक्तींना मुभा देणार नाहीत.

३. कार्यक्रमा करिता एकत्र जमणे :- मोठी सार्वजनिक संमेलने यास नियमितपणे मनाई असेल. जसे विवाह सोहळ्या साठी एकत्र येणाऱ्या व्यक्तींची संख्या ५० पेक्षा जास्त असणार नाही,तर अंत्यसंस्कार / अंत्यविधी यासबंधातील कार्यक्रमात एकत्र येणाऱ्या व्यक्तींची संख्या २० पेक्षा अधिक असणार नाही.

४. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे हे संपूर्णत: प्रतिबंधित करण्यात येत आहे. उल्लघन करणा-या व्यक्ति दंडांच्या शिक्षेस पात्र असेल.

५. सार्वजनिक ठिकाणी मद्यपान, पान, तंबाखू, इत्यादींच्या सेवनास मनाई आहे.

६. कामाच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निर्देश : शक्य असले तेथवर, घरुन काम करण्याची पध्दत अनुसरण्यात यावी. कार्यालये, कामाची ठिकाणे, दुकाने, बाजारपेठा आणि औद्योगिक व वाणिज्यिक आस्थापना यामध्ये कामाच्या / कामकाजाच्या वेळांची सुनियोजितपणे आखणी करावी.

७. परिक्षण (स्क्रीनिंग) व स्वास्थ :- औष्णिक परीक्षण (थर्मल स्क्रिनिंग) हात स्वच्छ करण्याचे द्रव्य (हॅण्डवॉश) व निर्जतुंकीकरण द्रव्य (सॅनिटायझर) हे सर्व प्रवेशद्वाराजवळ व निर्गमन द्वाराजवळ आणि सामाजिक क्षेत्रात पुरविण्यात येईल.

८. वारंवार निर्जंतुकीकरण (सॅनिटायझेशन) :- संपूर्ण कामाच्या ठिकाणचे, सामाजिक सुविधांचे व मानवी संपर्कात येणाऱ्या सर्व जागा यांचे, उदाहरणार्थ दरवाजांच्या मुठी (डोअर हॅण्डल) इत्यादीचे कामाच्या पाळयामध्ये वारंवार निर्जंतुकीकरण (सॅनिटायझेशन) करण्याची सुनिश्चिती करण्यात येईल.

९. सामाजिक अंतर राखणे :- कामाच्या ठिकाणांच्या सर्व प्रभारी व्यक्ती, कामगारांचे पुरेसे अंतर राखणे, कामाच्या पाळंयांदरम्यान पर्याप्त अंतर ठेवणे, दुपारच्या जेवणाच्या वेळेंत पुरेसे अंतर राखणे, इत्यादींद्वारे सामाजिक अंतर राखण्याची सुनिश्चिती करतील.

१०. कार्यालय प्रमुखांनी कार्यालयामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांमध्ये योग्य अंतर, दोन शिफ्ट मध्ये पुरेसा वेळ, जेवणाचे सुट्टीते नियोजन योग्य प्रकारे होईल याची दक्षता घ्यावी.

## जोडपत्र – दोन

## घराबाहेरील व्यायामा बाबत निदेश :

वैयक्तिक व्यायाम जसे सायकलींग, जॉगिंग, धावणे, चालणे या बाबी सार्वजनिक मोकळया जागा जसे खाजगी/सार्वजनिक मैदाने , पुणे महापालिकेची मैदाने, संस्था/सोसायटीची मैदाने , या ठिकाणी खालील अटींच्या अधीन राहून करता येईल. मात्र कोणतीही क्रिया क्रीडांगणाच्या बंदिस्त भागात केली जाणार नाही.

- वरील नमूद क्रिया या सामुदायिक स्वरूपात करता येणार नाही.तथापि मुलांच्या सोबत मोठी व्यक्ती असणे आवश्यक राहील.
- नागरिकांनी केवळ शारीरिक व्यायाम करण्याकरिता थोड्या वेळा करिताच घराच्या बाहेर जावे.
- वरील नमूद वैयक्तिक व्यायाम करण्या शिवाय अन्य कोणत्याही बाबी यांना परवानगी नसेल.
- नागरिकांनी केवळ आपल्या घराजवळील वरील नमूद मोकळया जागांचा वापर करावा.दूरच्या ठिकाणी वैयक्तिक व्यायाम करण्यासाठी त्यांना प्रवास करता येणार नाही.
- नागरिकांनी मोकळ्या मैदानात गर्दी करू नये असा त्यांना सल्ला देण्यात येत आहे. नागरिकांनी व्यायामाकरिता सायकलचा वापर करावा जेणे करून त्यांच्यात आपोआप सामाजिक सुरक्षित अंतर राहू शकेल.

## जोडपत्र – तीन

**अ) दुकाने सुरु करताना घ्यावयाची दक्षता : सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे राहतील**

- व्यवसाय धारकाने दुकानाची वेळ निश्चित केल्याप्रमाणे म्हणजे **सकाळी ०९.०० ते सायंकाळी** ०७.०० वाजेपर्यंत ठेवावी.
- नागरिकांनी खरेदीसाठी दुकानामध्ये शक्यतोवर घराच्या जवळील दुकानामध्ये जावे. जात असताना शक्यतो पायी जावे किंवा सायकलचा वापर करावा. बिगर अत्यावश्यक वस्तूच्या खरेदीसाठी लांबवर जाऊ नये
- दुकानामधील ट्रायल रूमचा वापर करता येणार नाही.त्याच प्रमाणे विक्री केलेले कपडे बदलून अथवा परत करता येणार नाही, जेणे करून संसर्गाचा प्रसार होणार नाही.
- दुकानामध्ये वस्तू खरेदीसाठी गर्दी होऊ नये व सुरक्षित अंतर राहावे याची जबाबदारी दुकानदाराची राहील.तसेच गर्दी होऊ नये म्हणून नागरिकांना उभे राहण्याच्या जागेवर ६ फुट अंतराच्या खुणा करणे,टोकन पद्धतीचा अवलंब करणे,किवा साहित्याचा घरपोच पुरवठा करू शकतात.
- व्यवसाय धारक आणि व्यवसायात काम करणारे कर्मचारी हे प्रतिबंधित क्षेत्राच्या बाहेरील भागात राहणारे असणे आवश्यक आहे.
- दुकानदारांनी कामगारांना फोटोसह ओळखपत्र द्यावे.
- दुकानामध्ये काम करताना दोन कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे.
- दुकानात काम करण्याऱ्या सर्व व्यक्तींनी मास्क आणि हातमोजे (Hand gloves) वापरावे.
- दुकानात काम करण्याऱ्या कर्मचा-यांना कोणतीही आजाराची लक्षणे दिसल्यास तात्काळ मनपा दवाखान्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घेऊन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

- कर्मचा-यांना हात वेळोवेळी स्वच्छ धुण्यासाठी साबण/सॅनिटायझरची व्यवस्था करावी व आवश्यक ती सुविधा उपलब्ध करून द्यावी.
- दुकानामध्ये शिरताना पायऱ्या आणि बाहेरील भाग १% सोडियम हायपो क्लोराइट द्रावणाने दररोज फवारणी करून घ्यावी.
- दुकानाचे काउंटर गिऱ्हाईक सोडून गेल्यानंतर १% सोडियम हायपो क्लोराइट द्रावणाने पुसून घ्यावी.
- दुकानात खरेदी करण्यासाठी आलेल्या नागरिकाने देखील मास्क घालणे आवश्यक आहे.
- दुकानांमध्ये सामाजिक सुरक्षित अंतराचे नियम पाळले जात नाही असे प्रशासनाच्या लक्षात आल्यास तात्काळ सदरची दुकाने बंद केली जातील.

**ब) कर्मचार्यांना कामाच्या ठिकाणी व्यवस्थापनाने घ्यावयाची काळजी**

i. कामाच्या ठिकाणी सर्वांना मास्क उपलब्ध करून दिले पाहिजेत व ते सर्वानी वापरणे आवश्यक आहे.

ii. कामाच्या ठिकाणी सुरक्षित अंतर सर्व कर्मचा-यांमध्ये राहणे आवश्यक आहे.

iii. कर्मचा-यांमध्ये सुरक्षित अंतर राहण्याच्या दृष्टीने कामाच्या २ शिफ्टमध्ये पुरसे अंतर व जेवणाच्या वेळा देखील निश्चित करून द्याव्यात .

iv. कामाच्या ठिकाणी येणाच्या व जाण्याच्या ठिकाणी त्यांचे शरीराचे तापमान घेण्यासाठी थर्मल स्कॅनिंग, हॅन्ड वॉश, सॅनिटायझर (स्पर्श विरहीत) ची व्यवस्था असावी तसेच कामाच्या ठिकाणी पुरेश्या प्रमाणात हॅन्ड वॉश व सॅनिटायझर उपलब्ध असावे, तसेच आठवड्यातून दोन वेळेला १% सोडियम हायपो क्लोराइट द्रावणाने फवारणी करून घ्यावी.

v. कामाच्या ठिकाणाची, सार्वजनिक वापरावयाच्या जागा आणि अन्य सर्व ठिकाणी ज्या भागाला व्यक्तीचा स्पर्श होतो. जसे दरवाजाची कडी, ई. याची स्वच्छता वारंवार होणे आवश्यक आहे.

vi. आरोग्य सेतू नावाचे ॲप सर्व कर्मचा-यांनी वापरणे बंधनकारक करणे याची जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील.

vii. कर्मचा-यांच्या मोठ्या उपस्थिती असलेल्या बैठका घेण्यात येऊ नये.

viii. कामाच्या ठिकाणी कोविड-१९ वर उपचार होणाऱ्या मनपाच्या दवाखान्यांची यादी लावणे आवश्यक आहे.

ix. कोणत्याही कर्मचा-यास कोविडची लक्षणे दिसल्यास त्यास तात्काळ तपासणीसाठी नेण्यात यावे. वैद्यकीय तपासणीस घेऊन जाईपर्यंत अश्या कर्मचाऱ्यांस ठेवण्याकरिता स्वतंत्र जागा निश्चित करून ठेवावी.

x. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नसेल त्यावेळेस कर्मचा-यांच्या सुरक्षित अंतर ठेवून वाहतुकीसाठी वाहनाची व्यवस्था करावी.

xi. चांगल्या प्रकारची स्वच्छता कशाप्रकारे ठेवावी याबाबत कर्मचा-यांना प्रशिक्षण आणि सतत संपर्क ठेवला पाहिजे.

xii. काम करीत असलेल्या व्यक्ती या केवळ प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील (Outside Containment Zone) राहणास असणे आवश्यक आहे.